। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १३ वा । शनिवार दिनांक १४ मार्च, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### दरोड्याच्या तयारीत असताना पोलिसांच्या हाती लागले

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, विश्वास उर्फ सगुना अशोक काळे, वय २० वर्षे, श्रीकांत उर्फ बबलु बापु पवार, वय २१ वर्षे, विक्रम आप्पा पवार, वय २० वर्षे, दिपक उर्फे बब्बी विलास पवार, वय १९ वर्षे, दिपक उर्फ आकड्या नितीन पवार, वय २० वर्षे, कालीदास उर्फ बापु फुलचंद काळे, वय १९ वर्षे, सुरेश उर्फ आबा बापु पवार, वय २० वर्षे, तानाजी सुर्यभान पवार, वय ७० सर्व रा. कल्पाना नगर पारधी पिडी कळंब, बालु उर्फ बालाजी शंकर पवार, वय २२ वर्षे, रा. शेही बाजार समोर कळंब, दिपक उर्फ बजरंग रवि काळे, वय २० रा. जुनी दुध डेबरी कहंब तसे इतर ६, बड्या उर्फ महादेव कल्याण पवार, मुन्ना उर्फ पोपट सुभाष पवार, वय २९ दोघे रा. कल्पना नगर पारधी पिडी कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१२.०३.२०२६ रोजी सु.मार्केट कृषी उत्पन्ना बाजार समिति कळंब कार्यालयाचे पाठीमागे पाण्याचे टाकीजवळ कळंब येथे दरोड टाकण्याचे उद्देशाने एकत्र येवून दरोड्याचे तयारीनीशी, लोखंडी २ तलवार, लोखंडी गज, लोखंडी रॉड, एक दोरी, दोन बॅटरी, कॅरीबॅग मध्ये तिखट पावडर व एककाळ्या रंगाचे हेक्झा ब्लेड काळ्या हॅण्डल असणारी एकुण १,८४५ किंमतीचे सामान नमुद व्यक्तीच्या कब्जात बाळगलेले कळंब पोलीसांना मिळून आले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रभा दासराव पुंडगे,महिला सहा पोलीस निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे कळंब यांनी दि.१२.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३१०(४),(५) सह कलम ४/२५ शास्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## बालविवाहमुक्त अभियानाला धाराशिवमध्ये गती

### चाइल्ड हेल्पलाईन १०९८ तर्फे विविध ठिकाणी जनजागृती उपक्रम

धाराशिव,दि.१३ मार्च (जिमाका) बाल विवाह मुक्त अभियानाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने चाइल्ड हेल्प लाईन कक्ष १०९८ अंतर्गत विविध ठिकाणी जनजागृती उपक्रम राबविण्यात आले.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी ए.बी.कोवे तसेच चाइल्ड हेल्प लाईन १०९८ चे प्रकल्प समन्वयक व्ही.पी.चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

या अंतर्गत धाराशिव येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था अध्यापक विद्यालय,धाराशिव, माविम अंतर्गत कार्यशाळेमध्ये माहिती देण्यात आली. तसेच रविकिरण स्कूल धाराशिव,रामतीर्थ तांडा तुळजापूर एन.एस.एस. कॅम्प, जि.प.प्रा.शा. तावरजखेडा,जि.प. प्रा.शा. खामसवाडी,जि.प.प्रा. शा. चिवरी,एस. एस.पी.महिला नेतृत्व विकास कार्यक्रम संवाद कार्यशाळा, जि.प.प्रा.शा.जागजी येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.यावेळी बालहक्क तसेच मुलांच्या समस्या याबाबत माहिती देण्यात आली. तसेच बेटी बचाव,बेटी पढाव आणि बालविवाह या विषयांवरही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बालकांसंबंधी विविध योजनांची माहितीही उपस्थितांना देण्यात आली.

चाइल्ड हेल्प लाईन कक्षाचे समुपदेशक वंदना कांबळे, सुपरवायझर अमर भोसले,पल्लवी पाटील तसेच केस वर्कर अभयसिंह काळे यांनी १०९८ चाइल्ड हेल्प लाईन कक्षाविषयी माहिती दिली.

या जनजागृती कार्यक्रमाला संबंधित प्रशाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## नागरिकांच्या सेवेसाठी प्रशासनाची तयारी: इंधन पुरवठा समस्येसाठी तालुका निहाय अधिकारी नियुक्त

धाराशिव (जिमाका) : सद्यस्थितीत आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युध्दाच्या तणावपूर्ण पार्श्वभुमीवर जिल्ह्यात घरगुती गॅसची पेट्रोल,डिझेल गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास नागरिकांना त्वरित मदत मिळावी याकरिता जिल्हा प्रशासनाने तालुका निहाय संपर्क अधिकाऱ्याची नियुक्ती केली असून संबंधित समस्याबाबत नागरिकांनी खालील संपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

श्रीमती विशाखा बलकवडे,नायब तहसिलदार महसूल/ पुरवठा, धाराशिव मो. ९७६७५८७४५४, श्रीमती मनिषा कोळगे,निरीक्षण अधिकारी पुरवठा,तुळजापूर मो. ८८८८२५८२८७, सचिन बिराजदार, निरीक्षण अधिकारी पुरवठा,उमरगा मो. ९९२२८०९८७३,श्रीमती हर्षाली खाडे,निरीक्षण अधिकारी पुरवठा, लोहारा मो.९४२२६१५९५८, श्रीमती मनिषा आस्कर,निरीक्षण अधिकारी पुरवठा,भूम मो. ८८०५९९१३४३, गोपाल तापडिया,निरीक्षण अधिकारी पुरवठा,कळंब मो. ९५२७२८१९६५, मिलींद पराळे,निरीक्षण अधिकारी पुरवठा,परंडा मो.९१७५५९५२१२, श्रीमती विद्या राठोड,निरीक्षण अधिकारी पुरवठा,वाशी मो. ९९२२९६२४६१ असे आहेत.

वरील अधिकारी यांचेशी संपर्क साधण्यात काही अडचण निर्माण झाल्यास जिल्ह्याच्या टोल फ्री क्रमांक १०७७ वर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## धाराशिवमध्ये १८ मार्च रोजी उद्योजक मेळावा; तज्ज्ञांचे मार्गदर्शन व गुंतवणूक संधींची माहिती

धाराशिव,दि.१३ मार्च (जिमाका) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन,दे आसरा फाऊंडेशन आणि व्यवस्थापन शास्त्र विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,उपपरिसर धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्थळ - ऑडिटोरियम हॉल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर,एम.आय.डी. सी कॅम्पस,धाराशिव येथे उद्योजक मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या उद्योजक मेळाव्यामध्ये व्यवसायाला चालना देणे,नवीन कल्पना (खवशरी) शेअर करणे आणि गुंतवणूकदारांशी जोडणे यासह भांडवल उभारणीसाठी विविध सरकारी योजनांची माहिती दिली जाणार आहे.याबाबत या क्षेत्रातील तज्ञ पल्लवी पाटील (रुरल एंटरप्राइजेस फायनान्स सपोर्ट कन्सल्टंट) यांचे मार्गदर्शन होणार आहे.तसेच उद्योजकांच्या विविध प्रश्नांची उत्तरेही या मेळाव्यात मिळणार आहेत.

याचबरोबर धाराशिव येथील सुप्रसिद्ध उद्योजक तसेच शेती व मध उत्पादनातील तज्ञ तेजस लिमकर यांच्यासोबत खास बातचीतची संधीही उपलब्ध होणार आहे.तसेच शासनाच्या विविध विभागांकडून उद्योजकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहितीही या मेळाव्यात देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजकांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,दे आसरा फाऊंडेशन आणि व्यवस्थापनशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,उपपरिसर धाराशिव यांनी केले आहे.या उद्योजक मेळाव्याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३४ वर संपर्क साधावा.

## एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा प्रा. आ. केंद्र येडशी येथे शुभारंभ



येडसी (प्रतिनिधी)- धाराशिव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, येडशी येथे आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी मुलींना गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने एचपीव्ही (र्कीरप झरळिश्रश्रोर तळीीि) प्रतिबंधक लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

सदर मोहीम मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

या प्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र येडशी येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. स्नेहल शिंदे, डॉ. प्रनिता क्षिरसागर, आरोग्य सहाय्यक सुर्यकांत गंगावणे, सुनील कदम, आरोग्य सहाय्यिका स्वरूपता दारफळकर, श्रीमती अश्विनी कांबळे, आरोग्य सेविका श्रीमती फुलाबाई कोळी,आरोग्य सेवक युवराज चौगुले, श्री. गजानन सुतार तसेच येडशी गावातील सर्व आशा सेविका (आशाताई) यांच्या उपस्थितीत लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लस प्रभावी आणि सुरक्षित आहे. धाराशिव तालुक्यातील सर्व पालकांनी आपल्या मुलींना ही लस देण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच जवळील उपकेंद्र, आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्या संपर्कात राहून लसीकरण करून घ्यावे. आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणारी ही मोहीम मुलींच्या आरोग्य संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून, नागरिकांनी या मोहिमेला सहकार्य करावे असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले.

## धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतीचा झंझावात! अध्यक्षपदी अर्चनाताई पाटील तर उपाध्यक्षपदी उषाताई गायकवाड; विरोधकांची गणिते कोलमडली




**धाराशिव । (रामेश्वर डोंगरे)**- धाराशिव जिल्हा परिषदेत अखेर महायुतीने जोरदार राजकीय बाजी मारत सत्ता आपल्या ताब्यात घेतली आहे. आमदार राणाजगजितसिंह (राणा दादा) पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांची जिल्हा परिषद अध्यक्षपदी निवड झाली असून, उपाध्यक्षपदी माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या पत्नी उषाताई गायकवाड यांची निवड निश्चित झाली आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना मोठा कलाटणी मिळाला असून महायुतीने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या कुशल राजकीय डावपेचांमुळे आणि शिवसेना (शिंदे गट) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या स्पष्ट पाठिंब्यामुळे जिल्हा परिषदेत महायुतीचे पारडे अधिक जड झाले. त्यामुळे अध्यक्षपदासाठी अर्चनाताई पाटील यांची निवड केवळ औपचारिकता ठरली होती.

शिवसेना (शिंदे गट) नेते विकी चव्हाण आणि जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करत अर्चनाताई पाटील यांच्या अध्यक्षपदाला जाहीर पाठिंबा दिला. या निर्णयामुळे जिल्हा परिषदेत महायुतीची ताकद आणखी भक्कम झाली.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महेंद्र धुरगुडे यांच्यासह अनेक सदस्यांनीही अर्चनाताई पाटील यांच्या उमेदवारीला जोरदार पाठिंबा दिला. त्यामुळे महायुतीची बाजू अधिक मजबूत झाली आणि विरोधकांची सर्व गणिते अक्षरशः कोलमडली.

दरम्यान, उपाध्यक्षपदी माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या पत्नी उषाताई गायकवाड यांची निवड झाल्याने जिल्हा परिषदेत शिवसेनेचेही वर्चस्व अधोरेखित झाले आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष ही दोन्ही महत्त्वाची पदे महायुतीकडे गेल्याने जिल्ह्यातील राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे चित्र दिसत आहे.

महायुतीच्या या एकजुटीमुळे जिल्ह्याच्या राजकारणात भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांचे मजबूत समीकरण पुन्हा एकदा सिद्ध झाले असून विरोधक मात्र चितपट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेत आता महायुतीचा झेंडा फडकला असून पुढील राजकीय घडामोडींवर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## लाखो रेशन कार्ड होणार बंद! 1 एप्रिलपासून कडक नियम - उत्पन्न व मालमत्ता तपासणीमुळे अनेकांचे धान्य बंद होण्याची शक्यता

**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)** – राज्यातील रेशन कार्डधारकांसाठी मोठी आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. शासनाने रेशन कार्डधारकांची उत्पन्न आणि मालमत्ता तपासणी करण्याचा निर्णय घेतला असून १ एप्रिलपासून नवीन कडक नियम लागू होणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो रेशन कार्ड रद्द होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शासनाकडून मिळणाऱ्या स्वस्त धान्य योजनेचा लाभ खरोखरच गरजू आणि पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचावा यासाठी सरकारने ही मोठी मोहीम सुरू केली आहे. अनेक ठिकाणी अपात्र लोकांकडेही रेशन कार्ड असल्याचे निदर्शनास आल्यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभागाने कठोर पावले उचलली आहेत.

नवीन नियमानुसार आता रेशन कार्डधारकांचे उत्पन्न, मालमत्ता, वाहन, घर आणि इतर आर्थिक स्थितीची तपासणी करण्यात येणार आहे. ज्यांचे उत्पन्न शासनाने ठरवलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आहे किंवा ज्यांच्याकडे जास्त मालमत्ता आहे, अशा कुटुंबांचे रेशन कार्ड थेट रद्द केले जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

तसेच ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली असून सर्व रेशन कार्डधारकांनी ती पूर्ण करणे आवश्यक आहे. ई-केवायसी न केल्यासही कार्ड बंद होऊ शकते, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे खऱ्या अर्थाने गरीब आणि गरजू नागरिकांना अधिक प्रमाणात धान्य उपलब्ध होईल, असा शासनाचा दावा आहे. मात्र अचानक होणाऱ्या या कारवाईमुळे अनेक नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

१ एप्रिलपूर्वी सर्व रेशन कार्डधारकांनी ई-केवायसी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, अन्यथा स्वस्त धान्याचा लाभ बंद होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## लातूर-मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-टेंभुर्णी महामार्गाचे चौपदरीकरण जलद गतीने पुर्ण करण्यासाठी अधिकचे २०५ कोटी रुपये मंजुर - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव, लातूर व बार्शी परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या लातूर-मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-टेंभुर्णी या प्रमुख मार्गाचे चौपदरीकरण व्हावे अशी बऱ्याच वर्षापासून मागणी प्रलंबीत होती. या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेच्या अधिवेशनात तसेच मंत्री महोदय नितीनजी गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत २९ सप्टेंबर २०१९, २१ नोव्हेंबर २०२१ लोकसभेच्या अधिवेशनादरम्यान प्रश्न क्र. ७१ व्दारे तारांकीत प्रश्न विचारला होता. त्यानंतर ०९ मार्च २०२१ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान नियम ३७७ व्दारे लक्षवेधी प्रश्न विचारुन सभागृहाचे लक्ष वेधले होते. ०५ एप्रिल २०२१ रोजी मंत्री महोदय, नितीनजी गडकरी यांची प्रत्यक्ष निवासस्थानी भेट घेवून प्रश्न मार्गी लावणे चर्चा केली. ०५ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यासोबत बैठक घेवून त्यानंतर २१ डिसेंबर २०२३ रोजी हिवाळी अधिवेशनादरम्यान नितीनजी गडकरी यांची भेट घेवून पाठपुरावा केला. त्यानंतर १८ डिसेंबर २०२४ रोजी मंत्रीमहोदयांच्या निवासस्थानी या प्रश्नाच्या अनुषंगाने भेट घेवून अश्वासक चर्चा केली. सदर मार्गाच्या चौपदरीकरणाबाबत वारंवार पाठपुरावा करुन या मार्गाच्या चौपदरीकरणाकरीता अखेर दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी लातूर-मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-टेंभुर्णी महामार्गाच्या चौपदरीकरणाकरीता ५७४ कोटी मंजुर करुन घेतले. या मार्गाच्या कामास गती देवून काम लवकरात लवकर पुर्ण होण्याकरीता नियमीत पाठपुरावा चालू असून मार्गावरील येडशी बायपास व उर्वरित कामांसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

या रस्त्याच्या उन्नतीकरणासाठी केंद्र सरकारकडून २०५.२३ कोटी रुपये मंजुर करुन घेतले. यांची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाली असून या निधीमुळे प्रलंबित कामांना गती मिळणार आहे. या कामामुळे या परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान आणि सोयीस्कर होणार आहे. सदरील काम लवकरात लवकर पुर्ण करण्याकरीता संबंधीतांना सुचना केल्या असून कामाचा नियमीत आढावा घेणार असल्याचेही खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी स्पष्ट केले आहे.

या महत्त्वाच्या मार्गाच्या विकासामुळे लातूर -मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-टेंभुर्णी परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून व्यापार, उद्योग व दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे परीसरातील नागरीकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचे अभिनंदन होत आहे.

## नौदल माजी सैनिक व कुटुंबीयांसाठी २५ मार्च रोजी धाराशिवमध्ये कल्याण मेळावा

धाराशिव, (जिमाका) भारतीय नौदल सैनिक,नौदल वीरनारी, नौदल युद्ध विधवा तसेच नौदल माजी सैनिकांच्या कल्याणासाठी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ महाराष्ट्रातील नौदल सैनिक,नौदल वीरनारी,नौदल युद्ध विधवा तसेच नौदल माजी सैनिकांच्या अवलंबितांच्या भेटीच्या मोहिमेंतर्गत जिल्ह्याच्या भेटीसाठी २५ मार्च २०२६ रोजी धाराशिव येथे येणार आहेत. या भेटीदरम्यान नौदलातील माजी सैनिक व त्यांच्या अवलंबितांना येणाऱ्या अडचणींचे मुद्दे जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले जाणार असून विविध शासकीय योजनांची माहितीही देण्यात येणार आहे.

या मेळाव्यास नौसेनेतील सर्व माजी सैनिक,माजी सैनिकांच्या पत्नी तसेच सर्व वयोवृद्ध सैनिकांनी दिनांक २५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सैनिकी मुलांचे वसतिगृह,धाराशिव येथे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि) यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजकारण, राजकारणाच्या ठिकाणी असावे

देशात काय जगात युद्धाची चर्चा सुरु आहे. यावर मात कशा प्रकारे करावी हाच विचार सर्वांना पडला असेल. मुळात संकटावर मात केल्यावर जी परिस्थिती निर्माण होते त्यावर एकजुटीने मात कशाप्रकारे करावी या बाबत विचार जनतेनी केला पाहिजे. राजकारणात, राजकारणी राजकारण खेळत असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टिका करीत आहेत. वास्तविक देशाचे प्रमुख पहिले नागरिक म्हणून त्यांना जागतिक स्तरावर जे करता येईल ते करीत असतील. देशातील नागरिकांना गॅसचा तुटवडा होणार नाही म्हणून जी खबरदारी घेणे अपेक्षित आहे ते करीत आहेत. सध्याला गॅस, इंधन हे इराण म्हणून येणारे बंद झाल्याने इतर देशातून जहाजामार्गे येत आहे. संकटावर कशाप्रकारे मात करता येईल त्याची उपायोजना केली जात आहे. तरी टिका होते. आज जरी काँग्रेसची सत्ता असती तर त्यांनी जे पंतप्रधान मोदी करीत आहेत तेच केले असते. दुसरा मार्ग नाही. एका राजकिय नेत्यांनी तर अमेरिका-ईस्त्राईल हे इराणशी युद्ध करीत आहेत यात मध्यस्थी करावी असे म्हटले आहे. असे वक्तव्य मुळात चुकीचे आहे. अयोग्य आहे. आपण मध्यस्थी करणारे कोण आहेत. जगात बहुसंख्येने इस्लामिक राष्ट्र सर्वाधिक आहे. भारत एकमेव हिंदु राष्ट्र समजला जातो. खालोखाल नेपाळ, बाकी नाही. वास्तविक सर्व ईस्लामिक राष्ट्र एक होवून अमेरिकेला समजावले पाहिजे. भारताचे पंतप्रधानांनी मध्यस्थी का करावी? या बाबत विचार केला पाहिजे. इंधनाचा भडका आज ना उद्या उडणार आहे. इंधनाची कमतरता भासणार आहे. स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर मिळेल मात्र ते जनसामान्यांना परवडणारे असेलच असे नाही. त्यामुळे आगामी काळात येणाऱ्या संकटाशी मुकाबला करण्यात सज्ज असले पाहिजे. युद्ध जरी थांबले तरी यातून इराणाला सावरण्यात वेळ लागणार आहे. तो मनमानेल तसे इंधानाचा दर ठरवेल. त्यावेळी भारताची काय जगाची स्थिती कशी असेल याचा विचार करावा. इंधनाचे कितीही दर वाढले तरी ते घ्यावे लागणार. पुर्वी पेट्रोलचे किंवा गॅस सिलेंडरची किंमती किती होत्या, आज काय आहेत. याचा विचार केला तर अनेक बाबी कळून येतील. जगात आगामी काळात भिषण आवस्था होणार आहे. याला कशाप्रकारे तोंड देणार, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आज ठिक आहे. भारत हा पर्याय शोधत आहे. त्यानुसार पावले पडत आहेत. इराण मध्ये युद्ध चालत असल्याने इतराकडून इंधन व गॅस घेण्याचा विचार सुरु आहे. देशातील नागरिकांनी खचुन न जाता याबाबत मुकाबला केला पाहिजे. या बाबत तोडगा काढण्यापेक्षा राजकारण खेळले जात आहे हेच मोठे दुर्दैव आहे. देशातील राजकारणी अधिकतर राजकारण खेळताना दिसून येत आहेत ते योग्य नाही. मोर्चे काढत आहेत. नको ते प्रदर्शन करीत आहेत. संकटावर मात करण्यासाठी सतत पर्याय शोधला पाहिजे. स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर मिळणार नसेल तर इतरबाबी इंधन म्हणुन वापर करू शकतोत. विद्युतचा वापर केला पाहिजे. सौरऊर्जाचा वापर वाढविला पाहिजे. पर्याय आहेत, त्याचा वापर केला जात नाही. इंधनाची बचत केली पाहिजे. तसा विचार केला तर इराण हा छोटे राष्ट्र आहे. अशा छोटा समजला जाणारा इराण सुद्धा दोन हात करण्यात तयार आहे. बलाढ्या शक्तीसमोर झुकत नाही. मोठ्या हिंमतीने लढत आहे. इराणाच्या प्रमुखांना ठार मारले तरी जनता हिंमतीने लढत आहे. वास्तविक इराण हा संपन्न देश आहे. धनसंपत्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यांची शहरे चकाचक असतात. मौल्यवान अभुषण घालतात. ते राष्ट्रासाठी लढण्याची हिंमत दाखवित आहेत त्यामुळे त्यांची कदर केली पाहिजे. अमेरिका हा जगात महासत्ताधिश देश आहे. आज पर्यंत दुसऱ्याच्या भुमीवर लढत आला आहे. दुसऱ्याच्या खांद्यावर बंदुक ठेवून लढत आला आहे. त्यात ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील व बालिश वक्तव्य करतील ते सांगता येत नाही. कधीही तोंडाला येईल तसे वक्तव्य आज पर्यंत केले आहे. हे लक्षात घेता आता भारतीयांनी जबाबदारीने वागले पाहिजे. भारतीयावर एक संकट अजून मोठ्या प्रमाणात आले नसताना घाबरत आहे. स्वयंपाकाचा गॅसचा कृत्रिम तुटवडा होत असताना हतबल होताना दिसून येत आहेत. त्यामुळे देशातील नागरिकांनी घाबरून न जाता संकटाशी मुकाबला करण्यात पुढे आले पाहिजे. इराण मधील नागरिकांची आवस्था काय होत असेल. त्यांचे हाल काय होत असतील याचा विचार केला पाहिजे. वास्तविक रमजान महिण्यात युद्ध होत आहे. याची आठवण इस्लामिक राष्ट्रातील जनतेला का होत नसेल? आता कुढे चीन हा देश इराण सोबत असल्याचे परराष्ट्र मंत्र्यानी म्हटले आहे. प्रत्यक्षात अजून इराण सोबत दिसून येत नाही. युद्धाचे वातावरण तापत राहीले तर चीन नंतर रशियासुद्धा यात पडण्याची शक्यता आहे. मुळात इराण हा एकटा लढत आहे.ही वस्तूस्थिती असली तरी प्रत्यक्षात अमेरिकेचा जोर चालू आहे. धमकी देत आहे. सध्याच्या परिस्थिती चिघळली तर तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहे. तिसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला तर जगात विपरीत घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिका हा महासत्ताधिश असला तरी त्याची निती योग्य नाही. छोट्या देशावर सत्ता गाजविण्याचा प्रयत्न सुरु आहेत. दुसऱ्याच्या भुमीचा वापर युद्धासाठी करण्याचा सततच मनसुबा आहे. त्यामुळे सध्याला परिस्थिती नियंत्रणाखाली असली तरी भारतीयांनी या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. भारतावर संकट ओढावल्यास दोन हात करण्याची तयारी असली पाहीजे. त्यावर मात करण्याची तयारी ठेवली पाहिजे. स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरचे संकट आले असले तरी त्यावर मात कशाप्रकारे करावयाची या बाबत विचार केला पाहिजे. राजकारण्यांनी विनाकारण बिनबुडाची टिका न करता योग्य काय ते मत मांडले पाहिजे. जनतेत संभ्रम निर्माण होणार नाही ना याची दक्षता घेतली पाहिजे. संकटावर मात कशा प्रकारे करता येईल याबाबत विरोधकांनी जनतेला मार्गदर्शन करावे. राजकारण खेळणे या परिस्थितीत योग्य नाही.

# राष्ट्रनिर्मितीसाठी समाजाची भागिदारी महत्वाची

## स्वामी रामदेव बाबा यांचे विचार: 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर'चे उद्घाटन



**पुणे/प्रतिनिधी :** ''राष्ट्रनिर्मितीसाठी राजकारण नाही तर समाजाची भागिदारी अत्यंत महत्वाची आहे. परिस्थिती आणि संघर्षामुळे प्रतिभा निर्माण होते. या प्रतिभेतूनच निर्मित झालेल्या 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' मुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडविण्याचे अद्वितीय कार्य सुरू झाले आहे. हे चारित्र्य, व्यक्ति निर्मिती व त्यातून राष्ट्रनिर्मितीसाठी अमूल्य योगदानाचे ठरेल.'' असे विचार पतंजली योगपीठाचे संस्थापक व आध्यात्मिक गुरू स्वामी रामदेव बाबा यांनी केले. येथे जीवन परिवर्तन करण्याचे खूप मोठे सूत्र दडल्याचे ही त्यांनी सांगितले.

तत्वदर्शी प्रज्ञावंत वै. सौ. उर्मिला वि. कराड यांच्या स्मृति प्रित्यर्थ देशात प्रथमच उच्च शिक्षणामध्ये दौंड तालुक्यातील बोरीबेल येथे उभारण्यात आलेल्या 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' (एलटीसी) च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामदेव बाबा बोलत होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. तसेच 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' चे संकल्पक व निर्माते डॉ. राहुल विश्वनाथ कराड हे उपस्थित होते.

यावेळी लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' (एलटीसी) च्या ब्रोशरचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी पद्मश्री पोपटराव पवार, राजीव गांधी खेल रत्न अवॉर्डी रंजन सोधी, संजीव निकम, नंदकिशार पाचपुते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ह.भ.प. श्री.बापूसाहेब मोरे,आमदार रमेशअप्पा कराड, श्री. राजेश कराड, श्री योगेश पाटील, एमआयटी डब्ल्यूपीयूचे सीओओ डॉ. प्रसाद खांडेकर व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वामी रामदेव बाबा म्हणाले,'' जीवन परिवर्तनात शिक्षण आणि स्वयंशिस्त महत्त्वाची असते. तरुणांमध्ये प्रचंड क्षमता असते. त्यांनी आपली स्वप्ने पगार पुरतीच मर्यादित न ठेवता समाज व राष्ट्र निर्मितीसाठी योगदान देण्याची असावी. धैर्य, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या माध्यमातून निर्धारित केलेले ध्येय गाठण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत. विचार प्रणाली अत्यंत गतिशिल असल्याने आहार व विचारांप्रती सतत सजग रहावे. तसेच शरीर, मन आणि भावनांना नियंत्रित करावे.''

''डिजिटल माध्यमांमुळे मुले रोज ८ तास वेळ वाय घालवितात त्यातून त्यांना काहीच उपलब्ध होत नाही. खेड्यांमध्ये काम करण्यासारखे खूप काही आहे. येथे आदर्शग्राम व चारित्र्य निर्मितीसाठी उत्तम शिक्षण व्यवस्था उभी करावी. स्वातंत्र्यानंतर ही देशात भारतीय शिक्षण व्यवस्था पद्धत नाही. त्यासाठी कार्य करावे. असा सल्ला ही स्वामी रामदेव बाबा यांनी दिला.''

केंद्रीय कृषि व किसान कल्याण आणि ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी ऑनलाइन भाषणात सांगितले की,'' जीवन परिवर्तन (एलटीसी) एक अद्वितीय उपक्रम आहे. भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातील अनुभवजन्य शिक्षणाचा गाभा आहे. भारताला बलशाली बनवण्यास, आत्मविश्वासू व राष्ट्रनिर्माते युवक घडविण्यास मदत करेल.''

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन संदेशात सांगितले की, '' दूरदर्शी विचार करुन डॉ. राहुल कराड यांनी उभारलेल्या जीवन परिवर्तन केंद्र (एलटीसी) प्रकल्पामुळे अत्याधुनिक शिक्षण व्यवस्था व समाजाला नवी दिशा मिळेल. पाच तत्वांवर आधारित केंद्र मानव कल्याणासाठी आहे.''

डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले,'' कृषी(शेती) आणि निसर्ग , शारीरिक तंदुरूस्ती आणि खेळ, संघटन कौशल्य आणि नेतृत्व, देशभक्ती आणि राष्ट्रनिर्माण व अध्यात्म आणि मनःशांती या ५ स्तंभावर आधारित हे केंद्र आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक व मानसिक आरोग्य जोपासण्याबरोबरच जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकसित करण्याचा हा शैक्षणिक क्षेत्रातील मैलाचा दगड आहे. हे केंद्र संपूर्ण भारताचे असून विद्यार्थ्यांनी येथून लाभ घेऊन बाहेर निघावे व देश परिवर्तनासाठी कार्य करावे.''

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, '' भारताला विश्वगुरूच्या रुपात पाहायचे असेल तर हे केंद्र महत्वाची भूमिका बजावेल. हे केंद्र जीवनाला नवी दृष्टी देणारे आहे. देह, बुद्धि, आत्मा आणि मन या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावे. ''

रंजन सोधी म्हणाले, '' देशात सर्वच क्षेत्राबरोबर शिक्षण व्यवस्थेत ज्या प्रमाणात परिवर्तन घडत आहे. त्यासाठी जीवन परिवर्तन केंद्र महत्वाची भूमिका निभावेल. तसेच जीवनात खेळाबरोबरच संवाद अत्यंत महत्वाचा आहे. ''

या प्रसंगी राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार, चंद्रकात पाटील, आमदार दत्तात्रय भरणे व ले. जनरल धिरज सेठ (पीव्हीएसएम, एव्हीएसएम) जनरल ऑफिस कमांन्डिंग इन चीफ सदर्न कमांड यांनी ऑनलाईन शुभेच्छा दिल्या.

डॉ. गौतम बापट सूत्रसंचालन यांनी केले. डॉ. प्रसाद खांडेकर यांनी आभार मानले.

# लातूर जिल्ह्यात बांबू विकास आणि सामाजिक सुरक्षा प्रकल्पाची होतेय प्रभावी अंमलबजावणी; ६ लाखांहून अधिक रोपांची लागवड



**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच त्यांना हवामान बदलाच्या संकटातून सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांबू आधारित कृषी-वनीकरणावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने महाराष्ट्र बांबू उद्योग धोरणही जाहीर केले आहे. हवामान बदलामुळे शेतीमध्ये निर्माण होणारी अनिश्चितता दूर करण्यासाठी बांबू हे एक प्रभावी पीक ठरत आहे. बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी लातूर जिल्ह्यात 'बांबू विकास आणि सामाजिक सुरक्षा' प्रकल्प राबविला जात आहे. लातूर जिल्ह्यात लोदगा येथील फिनिक्स फाउंडेशन आणि गोदरेज ॲग्रोव्हेट यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३ पासून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.

या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना केवळ बांबू लागवडीचे प्रशिक्षणच दिले जात नाही, तर त्यांच्या कौशल्य विकासावरही भर दिला जात आहे. लातूर जिल्ह्यात राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्सचे प्रमुख पाशा पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविला जात आहे. जिल्ह्यातील सर्व १० तालुक्यांमध्ये २०२३ ते २०२५ या कालावधीत सुमारे ६ लाख ११ हजार ७२९ बांबू रोपांची लागवड पूर्ण झाली आहे. आतापर्यंत एकूण २ हजार ८५२ शेतकऱ्यांनी या मोहिमेत नोंदणी केली असून, त्यापैकी १ हजार ९५३ शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानासाठी अर्ज सादर केले आहेत. या प्रकल्पासाठी शासनाकडून सुमारे ९० कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**पर्यावरणपूरक आणि किफायतशीर शेती**

बांबू हे कमी पाण्यावर येणारे पीक असून, उसाच्या तुलनेत याला अत्यंत कमी पाणी आणि रासायनिक खतांची गरज भासते. बांबूची झाडे इतर वृक्षांच्या तुलनेत ३० ते ३५ टक्के अधिक ऑक्सिजन उत्सर्जित करतात आणि मोठ्या प्रमाणात कार्बन शोषून घेतात. औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये कोळशाला पर्याय म्हणून बांबूचा वापर होत असल्याने देशाच्या स्वच्छ ऊर्जा मोहिमेला (ग्रीन एनर्जी) यामुळे चालना मिळत आहे.

**प्रशिक्षण आणि अंमलबजावणीवर भर**

औसा तालुक्यातील लोदगा येथे बांबू रोपवाटिका आणि अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत गाव आणि तालुक पातळीवर समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत. हे समन्वयक प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन शेतकऱ्यांना जमिनीची निवड, खड्डा खोदणे, ठिबक सिंचन आणि खत व्यवस्थापनाचे तांत्रिक मार्गदर्शन करत आहेत. यात प्रामुख्याने तुल्डा मानवेल यांसारख्या प्रगत जातींच्या ऊतक संवर्धन (टिश्यू कल्चर) तंत्रावर भर दिला जात आहे.

**शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी जनजागृती**

शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी मोबिलायझेशन व्हॅन, ध्वनिक्षेपक आणि लघुपटांच्या माध्यमातून गावोगावी बांबू शेतीचे महत्त्व पटवून दिले जात आहे. विशेष ग्रामसभा, प्रात्यक्षिक प्लॉट (डेमो प्लॉटस) आणि महिला बचत गटांना बांबूपासून शोभेच्या वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम सुरू आहे. बांबूपासून इंधन विटा, फर्निचर, हस्तकला, कागद आणि कापड यांसह १८०० पेक्षा अधिक वस्तूंची निर्मिती शक्य असल्याने, हा प्रकल्प लातूरच्या ग्रामीण भागासाठी विकासाची नवी दिशा ठरत आहे.

# ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी पल्स वैद्यकीय परिषद महत्वपूर्ण- वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ

राज्यातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम आणि तंत्रज्ञानाधारित केल्या शिवाय राज्याचा सर्वांगीण विकास शक्य नाही. राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक आधुनिक,तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, परिषदेत वैद्यकीय शिक्षणक्षेत्रातील विद्यार्थी, डीन, विशेषतज्ज्ञ, खाजगी शैक्षणिक संस्था तसेच आधुनिक वैद्यकीय उपकरणे उत्पादक कंपन्या सहभागी होणार आहेत. याचा राज्याच्या मेडिकल टूरिझम आणि ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा दर्जासुधारणे यासाठी यापरिषदेचे सहकार्य लाभणार आहे.

'पल्स वैद्यकीय परिषद' २७ आणि २८ मार्च २०२६ रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, बीकेसी येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या माध्यमातून आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, औषधनिर्मिती उद्योग,स्टार्टअप, तसेच वेलनेस पर्यटन या सर्व घटकांना एकाच व्यासपीठावर आणून

भविष्यासाठी स्पष्ट दिशा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ही परिषद केवळचर्चेपुरती मर्यादित न राहता ठोस निर्णय, गुंतवणूक करार, धोरणात्मक बदलआणि जनतेसाठी प्रत्यक्ष फायदे निर्माण करणारे व्यासपीठ ठरणार आहे.

राज्य आरोग्य क्षेत्रात अग्रगण्य असून देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक,उद्योगपती आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी होणार आहेत. त्यांच्या सहभागामुळे नवीन तंत्रज्ञान, आधुनिक उपचारपद्धती आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक राज्यात येण्यास मदत होईल. याचा थेट फायदा रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्यात, डॉक्टरांना नवीन संधी उपलब्ध होण्यात आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व संशोधनाचा अनुभव मिळण्यात होणारआहे.

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि उपकरणांची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळावी हा यामागील उद्देश आहे. आयुष क्षेत्रात आयुर्वेद आणि ॲलोपॅथी यांच्यात समन्वय साधून एकात्मिक आरोग्य व्यवस्था निर्माण करण्यावरही भर देण्यात येणार आहे. तसेच फार्मसी क्षेत्रातील नवीन संशोधन, डॉक्टरांचे संशोधन पेपर आणि नवकल्पना यांचे सादरीकरणही परिषदेत होणारआहे.

या उपक्रमाला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. परिषद उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आला. परिषदेत सुमारे २,९०० प्रतिनिधी सहभागी होणार असून त्यासाठी क्यूआर कोड आधारित प्रवेश, स्वतंत्र सत्र हॉल, हेल्पडेस्क,स्वयंसेवक आणि लाईव्ह स्क्रीनिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच सुरक्षा, वैद्यकीय आपत्कालीन सेवा, वाहतूक आणि निवास व्यवस्थेसाठी स्वतंत्र समन्वय कक्षही कार्यरत असेल.

परिषदेतील प्रमुख विषयांमध्ये डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता,वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा व कौशल्य विकास, संशोधन आणि नवकल्पना,मेडिकल व वेलनेस पर्यटन, गुंतवणूक तसेच ग्रामीण व सार्वजनिक आरोग्य बळकटीकरण या विषयांचा समावेश आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या विषयांवर व्यापक चर्चा केली जाणारआहे.

परिषदेत 'डिजी डोम' आणि 'टेक टॉक' या विशेष संकल्पनांचा समावेश करण्यातआला आहे. ३६० डिग्री डोममध्ये रोबोटिक सर्जरी, व्हर्च्युअल रिॲलिटीद्वारे मेडिकल प्रशिक्षण, डिजिटल हॉस्पिटल व्यवस्थापन यांसारख्या तंत्रज्ञानाचे लाईव्ह आणि इमर्सिव्ह प्रेझेंटेशन सादर केले जाणार आहे.टेक टॉक सत्रांमध्ये देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक आणि उद्योगक्षेत्रातील नेते आपले अनुभव आणि नवीन कल्पना मांडतील. यामुळे तरुणडॉक्टर, विद्यार्थी आणि स्टार्टअप उद्योजकांना प्रेरणा आणि दिशा मिळेल.

या परिषदेच्या माध्यमातून राज्यासाठी स्पष्ट कृती आराखडा तयार करण्यातयेणार असून संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन भागीदारी करार,वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा, गुंतवणूक आणि स्टार्टअप्ससाठी प्रकल्पघोषणा होण्याची अपेक्षा आहे. रोबोटिक सर्जरी, व्हर्च्युअल रिॲलिटीआधारित शिक्षण आणि तंत्रज्ञानाधारित उपचार प्रणाली यामुळे भविष्यातीलआरोग्य सेवा अधिक सक्षम होईल.

महाराष्ट्र वेलनेस पर्यटनाच्या क्षेत्रातही आघाडीवर आहे. सह्याद्रीपर्वतरांगा, समुद्रकिनारे, हिल स्टेशन, जंगल परिसर तसेच योग, आयुर्वेद,पंचकर्म आणि निसर्गोपचार केंद्र यामुळे राज्यात वेलनेस पर्यटनाला मोठीसंधी उपलब्ध आहे. उत्तम आरोग्य सुविधा आणि नैसर्गिक उपचार पद्धती यांचीसांगड घालून राज्याला जागतिक वेलनेस डेस्टिनेशन म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे पर्यटन वाढ, रोजगारनिर्मिती आणि आंतरराष्ट्रीय ओळख मिळण्यास मदत होणार आहे.

वेलनेस पर्यटनामुळे ग्रामीण भागातही रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.स्थानिक युवकांना योग प्रशिक्षक, थेरपिस्ट किंवा गाईड म्हणून प्रशिक्षणदेता येईल. महिला बचतगटांना हर्बल उत्पादने, स्थानिक आहार आणि होमस्टेसुविधा चालविण्याची संधी मिळेल. औषधी वनस्पतींची लागवड आणि हर्बल फार्मिंगमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यासही मदत होईल.

आंतरराष्ट्रीय रुग्णांना आकर्षित करण्यासाठी विशेष योजना राबविण्याचा विचारही शासन करत आहे. मेडिकल व्हिसा प्रक्रिया सुलभ करणे, प्रमुखशहरांमध्ये इंटरनॅशनल पेशंट हेल्पडेस्क स्थापन करणे, बहुभाषिक मार्गदर्शनउपलब्ध करून देणे, तसेच विमानतळ ते रुग्णालय समन्वय व्यवस्था उभारणे यांसारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.पल्स परिषदेत स्टार्टअप क्षेत्रासाठी विशेष व्यासपीठ उपलब्ध करून देण्यातयेणार आहे. तरुण उद्योजकांना त्यांच्या कल्पना गुंतवणूकदार, उद्योगपतीआणि धोरणकर्त्यांसमोर मांडण्याची संधी मिळेल. तसेच बल्क ड्रगपार्कसारख्या प्रकल्पामुळे औषधनिर्मिती उद्योगाला चालना मिळून औषधांचा खर्च कमी करण्यास मदत होईल.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील आरोग्य सेवा मजबूत करणे हा या परिषदेचा महत्त्वाचा उद्देश आहे. टेलिमेडिसिन, डिजिटल हेल्थ रेकॉर्ड, मोबाईल हेल्थॲप्स आणि उच्चगती इंटरनेटच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांनातज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला उपलब्ध करून देण्याची व्यवस्था विकसित केली जातआहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांना तंत्रज्ञानाने सक्षम करून उपचार अधिकवेगवान आणि अचूक करण्याचा प्रयत्न आहे.

मानसिक आरोग्य क्षेत्रालाही परिषदेत विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.टेलि-मेंटल हेल्थ सेवा, विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य कार्यक्रम, २४तास हेल्पलाईन आणि डॉक्टरांसाठी विशेष प्रशिक्षण यांसारख्याउपक्रमांद्वारे मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न केलाजाणार आहे.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाला चालना देण्यासाठी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संशोधन प्रयोगशाळा मजबूत करणे, संशोधन अनुदाने उपलब्ध करून देणे आणि उद्योग-संशोधन संस्था-शासन यांच्यात सहकार्य वाढविणे अशीपावले उचलली जात आहेत. विद्यार्थ्यांना संशोधन पेपर सादरीकरण, पोस्टरप्रेझेंटेशन, इंटर्नशिप आणि करिअर नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य व्यवस्थेत महाराष्ट्राला देशात अग्रस्थानी नेणे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात जागतिक दर्जाचे केंद्र निर्माण करणे, ग्रामीण आणि आदिवासी भागात मजबूत प्राथमिक आरोग्य सुविधा उभारणे तसेच मेडिकल आणि वेलनेस पर्यटनाच्या माध्यमातून राज्याला आंतरराष्ट्रीय आरोग्य गंतव्यस्थान म्हणून विकसित करणे हे शासनाचे दीर्घकालीन ध्येय आहे.




## येऊदे कितीही अडचणींचं वारं... मी जिंकून घेईन सारं नवी मालिका कलर्स मराठीवर



भारती आचरेकर दिसणार मराठी मालिकेत पहिल्यांदाच !

मुंबई : असं म्हणतात रक्ताच्या नात्यापेक्षा जोडली गेलेली नाती कधी कधी अत्यंत प्रिय असतात. ती आपल्यासाठी कुठलंही वादळ झेलून नेतात, आपल्यामागे खंबीरपणे उभी असतात आणि वेळ पडल्यास जीव ओवाळून टाकायला देखील मागं पुढे पाहत नाहीत. याच धाग्यावर आधारित नवी मालिका 'मी जिंकून घेईन सारं'. या नव्या मालिकेतील छवी देखील अशीच आहे. रक्ताचं नातं नसलं तरीदेखील छवीसाठी बाई- आजी म्हणजे देवासमान आहेत त्यांच्यासाठी आणि राजगुरू परिवारासाठी छवी काहीही करू शकते. पण, या कुटुंबाचे रक्षण करताना तिच्यासमोर अनेक अडथळे येणार आहेत, त्यांना ती कशी सामोरी जाणार ? कशी ते हे सगळ निभावून नेणार? हे जाणून घेण्यासाठी नक्की पहा 'मी जिंकून घेईन सारं'. नुकताच या मालिकेचा प्रभावी प्रोमो आला असून, त्याने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. या प्रोमोमधील सर्वात मोठं आकर्षण ठरते ते ज्येष्ठ अभिनेत्री भारती आचरेकर. त्या 'बाई-आजी' या अत्यंत वेगळ्या, ठाम आणि प्रभावी भूमिकेत प्रथमच मराठी मालिकेत दिसणार आहेत. कमी संवादांतूनच त्यांची स्क्रीन प्रेझेन्स, लाघवी व्यक्तिमत्त्व आणि करारी बाणा ठसठशीतपणे जाणवतो. अत्यंत गोड, सोज्वळ आणि प्रत्येकाचं मन जिंकून घेणारी छवीची भूमिका जान्हवी तांबट साकारणार आहे. शांभवीची भूमिका अमृता फडके, वत्सला- वंदना वाकनीस, अनिकेत - संचीत चौधरी, साकेत - अमित रेखी आणि बेबी आत्या - दिशा दानडे हे देखील महत्वपूर्ण भूमिकेत असणार आहेत.

राजगुरु परिवाचा डोलारा बाई - आजी सांभाळत आहेत. त्या कुटुंबाच्या कर्ताधर्ता आहेत. जसं जिजाऊ शिवाजी महाराजांच्या मागे खंबीरपणे उभ्या होत्या, तसंच बाईजी आपल्या मुलाच्या पाठीशी उभ्या राहिल्या. एका अपघातात मुलगा आणि सून अकाली गेले. तेव्हापासून बाई - आजींनी साकेत आणि अनिकेत या आपल्या नातवंडांना आईची माया दिली. आणि याच राजगुरू परिवारात लहानाची मोठी झाली आपली छवी. सुंदर, सुशील या पारंपरिक चौकटीत न बसणारी ही ळाशिीषशर्ली छवी...स्वभावाने बडबडी, थोडीशी अति उत्साही; पण तितकीच हुशार. प्रत्येक नात्यात मनापासून जीव ओतणारी. बाई - आजींचा रुबाब, छवीची त्यांच्यावर असलेली निष्ठा क्षणोक्षणी प्रकर्षाने दिसून येते. एकीकडे बाई - आजी आणि छवीचं सावलीसारखं नातं. पण, या परिवारावर वाकडी नजर आहे ती म्हणजे अत्यंत चाणाक्ष, धूर्त, अप्पलपोटी आणि उलट्या काळजाची मुलगी शांभवी हिची. हिच्या मनात साचलेला भूतकाळ आणि सूडाची भावना हे राजगुरू परिवारावर नक्कीच कुठलं तरी संकट घेऊन येणार. राजगुरू परिवारात येऊन त्यांना उध्वस्त करण्याचा शांभवीचा डाव छवीला समजेल ? कितीही संकटं आली तरी छवी ती खंबीरपणे कशी निभावून नेणार ? शांभवीच्या सूडामागचं नेमकं कारण काय आहे ? छवी राजगुरू कुटुंबाचं रक्षण करताना कोणती किंमत मोजणार? हे बघणे उत्सुकतेचे असणार आहे.

बाई-आजी ठामपणे तिच्या पाठीशी उभी राहताना दिसणार आहे. प्रोमोमध्ये बाई-आजी आणि छवीमधील अतूट विश्वासाचं नातं ठळकपणे दिसून येतं. आयुष्याच्या निर्णायक क्षणी बाई-आजी प्रत्येक निर्णयासाठी छवीच्या ठाम व्यक्तिमत्त्वावर आणि विचारांवर विसंबून असल्याचं जाणवतं. छवीवर असलेला बाई-आजींचा अढळ विश्वास आणि तिच्याकडून मिळणारा आधार हा या नात्याचा गाभा आहे. ज्यांच्यावर प्रेक्षक मनापासून प्रेम करतात अश्या आपल्या लाडक्या भारती आचरेकर या मालिकेविषयी बोलताना म्हणाल्या, 'बाई-आजी' ही केवळ परंपरागत चौकटीतली आजी नाही, तर उदारमतवादी, मोकळ्या विचारांची आजी आहे. काळानुसार बदल स्वीकारणारी, आजच्या पिढीच्या विचारांशी सहज जुळवून घेणारी आणि स्निकर घालून आत्मविश्वासाने वावरणारी ही 'कूल' आजी कायम हसतमुख व आनंदी असते. नातवंडांना समजून घेणारी, त्यांच्याशी मैत्रीपूर्ण नातं जपणारी अशी ती स्त्री आहे. तरीही घराचा कणा असलेली, संकटांनी तावूनसुलाखून निघालेली पण कधीही न ढासळणारी ही बाई-आजी' नातवंडांसाठी खंबीरपणे उभी आहे. नातवंडांना स्वप्न पाहू देतात, पण शिस्त आणि जबाबदारीची जाणीवही करून देतात. प्रामाणिकपणा आणि कष्ट यांना त्या सर्वाधिक महत्त्व देतात, म्हणूनच मेहनती छवीवर त्यांचा खास जीव आहे. अनुभवसंपन्न असूनही भावना कधी कधी त्यांच्या निर्णयांवर मात करतात, आणि त्यामुळेच ही व्यक्तिरेखा अधिक जिवंत व मानवी वाटते. सर्वात खास म्हणजे, इतक्या वर्षांच्या कारकिर्दीनंतर मी पहिल्यांदाच मराठी मालिकेत इतक्या मध्यवर्ती भूमिकेत काम करते आहे. त्यामुळे माझ्यासाठी हा एक नवा आणि उत्सुकतेचा टप्पा आहे. 'बाई-आजी'सारखं बहुपेडी, ताकदीचं आणि भावनिक छटा असलेलं पात्र मला साकारायला मिळणं ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे.

मालिकेविषयी बोलताना एुशर्लीींळींश तळलश झीशीळवशपीं, चरीरींहळ उश्रीींींशी, सतीश राजवाडे म्हणाले, आमचा प्रयत्न नेहमीच दर्जेदार आणि वेगवेगळ्या धाटणीची कथानकं प्रेक्षकांसमोर आणण्याचा असतो. बऱ्याच काळानंतर आम्ही एक फिक्शन मालिका घेऊन येत आहोत, जी संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून पाहावी अशी आहे आणि सर्व वयोगटातील प्रेक्षकांना भावेल अशी आहे. 'मी जिंकून घेईन सारं' ही जिद्द, नात्यांची गुंतागुंत आणि मूल्यांची परंपरा यांचा संगम असलेली कथा आहे. ही छवीची गोष्ट आहे जिने लहानपणापासून अनेक संकटांना सामोरं जात आयुष्य घडवलं, पण आपल्या माणसांसाठी प्रत्येक लढाई जिंकण्यावर तिचा ठाम विश्वास आहे. पुढे ते म्हणाले, छवीच्या आयुष्यात बाई-आजींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्या तिचं आधारस्थान आणि तिचा खरा सपोर्ट सिस्टीम आहेत. बाई-आजींचं निखळ प्रेम आणि विश्वास यामुळेच छवी खंबीरपणे उभी आहे आणि घराला सांभाळून ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करत आहे. या मालिकेद्वारे भारती आचरेकर पहिल्यांदाच टेलिव्हिजनवर दिसणार आहेत आणि ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांचा समृद्ध आणि प्रदीर्घ अनुभव या मालिकेचं सर्वात मोठं बळ आहे. प्रेक्षकांना एक दर्जेदार आणि अर्थपूर्ण अनुभव देण्यात आम्ही नक्कीच यशस्वी ठरू, असा आम्हाला विश्वास आहे. या संघर्षात महत्त्वाची भूमिका बजावणारी बबी आत्या देखील टीझरमध्ये दिसते. आत्याची उपस्थिती कथेला आणखी धार देणार. नात्यांमधील ताणतणाव, घरातला संघर्ष आणि एका ठाम स्त्रीचा खंबीर आवाज या सगळ्याची झलक देणारा 'मी जिंकून घेईन सारं' चा हा प्रोमो प्रेक्षकांना अनेक प्रश्नांसह सोडून जातो. येऊदे कितीही अडचणीचं वारं मी जिंकून घेईन सारं...पहा १६ मार्चपासून संध्या. ७ वा. कलर्स मराठीवर.

# घबाडकुंड चित्रपट ठरणार मराठीतला पहिला युनिव्हर्स

'घबाडकुंड' चित्रपट ठरणार मराठीतला पहिला युनिव्हर्स

वेबसाइटवर प्रचार करू शकता:

मुंबई : हॉलिवूड आणि बॉलिवूडमध्ये गाजलेल्या चित्रपटांच्या 'युनिव्हर्स' संकल्पनेची आता मराठी चित्रपटसृष्टीतही दमदार एंट्री होत आहे. परस्परांशी जोडलेल्या कथानकांमधून वेगवेगळ्या चित्रपटांची एक भव्य गोष्ट सादर करण्याचा अनोखा प्रयत्न 'घबाडकुंड' या आगामी मराठी चित्रपटाच्या निमित्ताने मराठीत पहिल्यांदा होतोय. हा युनिव्हर्स चित्रपट प्रेक्षकांना थरार आणि रहस्य याचा रंजक सिनेमॅटिक अनुभव देणार आहे. अनेक कथा, रहस्य आणि पात्रं यांना एकाच धाग्यात गुंफणारा हा अनोखा प्रयोग प्रेक्षकांसाठी खास आकर्षण ठरणार आहे.

निर्माते रसिक कदम यांच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेतून साकारत असलेला 'घबाडकुंड' हा चित्रपट येत्या १९ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'अल्याड पल्याड' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर दिग्दर्शक प्रीतम एस. के. पाटील 'घबाडकुंड' प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत. भय, थरार, रहस्य असा भरगच्च मसाला असलेला 'घबाडकुंड' चित्रपट सादरीकरणाच्या दृष्टीने प्रेक्षकांसाठी 'स्पेशल ट्रीट' असणार आहे. आयुष्यात अनपेक्षित घटनांनी काहींच्या स्वप्नांना पंख फुटतात, पण त्याचवेळी पडद्यामागे सुरू असतो संशय आणि संकटांचा भयानक खेळ. भीती आणि अनिश्चिततेच्या छायेत घडणाऱ्या अकल्पित घटनांमुळे कथानक प्रत्येक टप्प्यावर नवे प्रश्न उभे करते. सत्याच्या शोधात निघालेल्यांना कोणत्या गोष्टीला सामोरे जावे लागते? आणि शेवटी नशिब जिंकतं की माणूस? याची उत्कंठा वाढविणारा 'घबाडकुंड' हा भव्य चित्रपट येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत आहे. देवदत्त नागे, कुशल बद्रिके, संदीप पाठक, शशांक शेंडे, प्राजक्ता हनमघर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, रॉकी देशमुख, आरोही भोईर, योगेश प्रकाश तनपुरे, साहिल अनलदेवर आदि कलाकारांची दमदार फौज 'घबाडकुंड' चित्रपटात आहे.




महिला दिनाचं औचित्य साधत 'घबाडकुंड' चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची घोषणा आणि चित्रपटाचा 'फर्स्ट लूक' नुकताच एका शानदार सोहळ्यात प्रदर्शित करण्यात आला. याप्रसंगी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान स्त्रियांचा गौरवचिन्हे आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यासोबत स्टायलिश आणि ग्लॅमरस फॅशन शोची शानदार झलक उपस्थितांनी अनुभवली. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणारे निर्माते रसिक कदम यांची 'आयकॉन दी स्टाईल' कंपनी आता 'घबाडकुंड' चित्रपटाच्या माध्यमातून मराठी मनोरंजन क्षेत्रात जोरदार पदार्पण करण्यास सज्ज झाली आहे.

याप्रसंगी निर्माते रसिक कदम म्हणाले,'घबाडकुंड' हा एक वेगळा आणि रोमहर्षक अनुभव असणार आहे. उत्तम कथानक, दर्जेदार सादरीकरण आणि कलाकारांचा जबरदस्त अभिनय या सगळ्यांचा उत्तम संगम या चित्रपटात पहायला मिळेल. १९ जूनला हा चित्रपट प्रेक्षकांसमोर येणार असून, त्यांना नक्कीच एक वेगळी आणि थरारक कथा पहायला मिळेल याची आम्हाला खात्री आहे.'

'मराठीत 'युनिव्हर्स' चित्रपट करण्याचं स्वप्न मी खूप दिवसांपासून पाहत होतो. या चित्रपटाच्या निमित्ताने ते स्वप्न साकार होत आहे, याचा मला विशेष आनंद आहे. नव्या पिढीला अशी वेगळी आणि मोठ्या कॅनव्हासवरची संकल्पना खूप आवडते. त्यांच्या आवडीचा विचार करूनच हा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला आहे,' असे मत दिग्दर्शक प्रीतम एस. के. पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

'घबाड़कुंड' चित्रपट मराठीसह दाक्षिणात्य भाषांमध्ये सुद्धा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे लेखन संजय नवगिरे, अक्षय धरमपाल यांचे आहे. गीतकार नयूम पठाण आहेत. कलादिग्दर्शन योगेश इंगळे, छायांकन योगेश कोळी तर संकलन सौमित्र धाराशिवकर यांचे आहे. साऊथचे प्रसिद्ध फाईट मास्टर कार्तिक यांनी या चित्रपटासाठी बॅकग्राउंड म्युझिकची जबाबदारी अभिनय जगताप यांनी सांभाळली आहे. रि-रेकॉर्डिंग मिक्सर सुजित शिनगारे व साउंड डिझाइन मानव श्रोत्रिय (एम पी एस सी) यांचे आहे. मॅनेजर विष्णु घोरपडे आहेत.

'घबाडकुंड' चित्रपटाच्या निमित्ताने मराठीत पहिल्यांदाच साकारत असलेल्या या 'युनिव्हर्स'मुळे हा चित्रपट जबरदस्त सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे.

## युद्धामुळे अडकलेली लारा दत्ता मुलीसह भारतात परतली

मुंबई : मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अनेक भारतीय नागरिक परदेशात अडकले आहेत त्या काळात लारा दत्ताही तिच्या मुलीसह संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकली होती. मात्र काही दिवसानंतर ती आपल्या मुलगी सायरासह सुरक्षितपणे भारतात परतली आहे. भारतात आल्यानंतर तिने त्या काळातील भीतीदायक अनुभव सांगितला.

मध्यपूर्वेत इराण , इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावामुळे हवाई हल्ल्यांचे वातावरण निर्माण झाले होते. या परिस्थितीत अनेक भारतीय नागरिकांसह काही चित्रपट कलाकारही यूएईमध्ये अडकले होते. त्यात लारा दत्ता हिचाही समावेश होता. यापूर्वी सोनल चौहान, उर्वशी रौतेला आणि इशा गुप्ता या अभिनेत्री देखील दुबईहून भारतात परतल्या होत्या.

लारा दत्ताने काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ शेअर करून तेथील तणावपूर्ण परिस्थितीची माहिती दिली होती. त्यात तिने सांगितले होते की, ती तिच्या १४ वर्षांच्या मुलीसोबत दुबईमध्ये होती. तिचे पती महेश भूपती हे त्या वेळी कामानिमित्त लंडन येथे होते. मुलगी सायराला नामांकित प्रशिक्षकाकडे टेनिसचे प्रशिक्षण देण्यासाठी ती दुबईला गेली होती.

तणाव वाढत असताना नागरिकांना घरातच राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. लारा दत्ताने सांगितले की, त्या काळात संयुक्त अरब अमिरातीच्या प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी चांगली व्यवस्था केली होती. तरीही परिस्थिती गंभीर असल्याने तिने भारतात परतण्याचा निर्णय घेतला.

भारताकडे परतण्याचा निर्णय सोपा नव्हता. लाराच्या म्हणण्यानुसार, ती आणि तिची मुलगी जेथे राहत होत्या ते ठिकाण जेबेल अली पोर्ट पासून केवळ दहा किलोमीटर अंतरावर होते आणि त्या परिसरात स्फोटांच्या घटना घडत होत्या. त्यामुळे त्यांनी धोका पत्करत तेथून निघण्याचा निर्णय घेतला.

यानंतर त्यांनी सुमारे दोन तासांचा प्रवास करून फुजैराला पोहोचून तेथून विमानाने भारतात परतण्याचा मार्ग निवडला. लाराने सांगितले की, ते निघण्याच्या आदल्या दिवशीच त्या परिसरातील विमानतळ आणि तेल शुद्धीकरण प्रकल्पाजवळ स्फोट झाले होते. त्यामुळे तो प्रवास अत्यंत भीतीदायक होता. काही तासांच्या अनिश्चिततेनंतर लारा दत्ता आणि तिची मुलगी सुरक्षितपणे भारतात पोहोचल्या. त्या काळातील अनुभव खूपच तणावपूर्ण आणि थरारक असल्याचे तिने सांगितले.



## मी इराणला परत जाऊ शकत नाही, ते मला मारतील..

इराण-इस्त्रायल-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर बॉलिवूड अभिनेत्री एलनाज नौरोजी हिने केलेल्या वक्तव्यामुळे खळबळ उडाली आहे. इराणमधील राजकीय परिस्थितीवर टीका करताना तिने आपल्या जीवाला धोका असल्याचा गंभीर दावा केला आहे. **नेमकं प्रकरण काय?**

मूळची इराणी असलेली आणि जॉन अब्राहमसोबत 'तेहरान' चित्रपटात दिसलेली अभिनेत्री एलनाज नौरोजी हिने इराणमधील सत्तांतरावर खुलेपणाने मत व्यक्त केले. इराणमध्ये खऱ्या अर्थाने सत्ताबदलाची गरज असल्याचे सांगत सध्याची व्यवस्था कॅन्सरसारखी असल्याची तीव्र टीका केली. तिने इराणमध्ये दरम्यान, सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलगा मोज्तबा खामेनी यांची नवे सर्वोच्च



नेते म्हणून निवड झाल्याच्या चर्चांवरही एलनाजने प्रश्न उपस्थित केले. हा निर्णय जनतेच्या इच्छेनुसार नसल्याचा आरोप तिने केला.इराणमध्ये लोकांना नेता निवडण्याचा अधिकार नाही एलनाज नौरोजीने म्हटले की, इराणमध्ये गेल्या अनेक दशकांपासून लोकांचा आवाज दाबला जात आहे. गेल्या ४७ वर्षांपासून इराणमधील नागरिकांना खऱ्या अर्थाने मतदानाचा अधिकार मिळालेला नाही, असा दावा तिने केला.तिने २००९ मधील मोठ्या आंदोलनांचा उल्लेख करत सांगितले की, लाखो लोक रस्त्यावर उतरून आमचं मत कुठे आहे? अशी घोषणा देत होते. त्या आंदोलनात अनेक लोकांनी आपले प्राणही गमावले, मात्र परिस्थिती बदलली नाही, असेही तिने सांगितले.



मी इराणला परत गेले तर मला मारतील :इराणमध्ये जन्मलेली एलनाज नौरोजी नंतर कुटुंबासह जर्मनीला स्थलांतरित झाली. सुमारे वीस वर्षांची असताना ती भारतात आली आणि चित्रपटसृष्टीत काम करू लागली. एलनाजने सांगितले की, ती गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ इराणला गेलेली नाही आणि सध्याच्या परिस्थितीत तिथे परत जाणे शक्य नाही. मी इराणला परत जाऊ शकत नाही. जर मी तिथे गेले तर माझ्या जीवाला धोका आहे. ते मला मारून टाकतील, असा

# हम काले हैं तो क्या हुआ दिलवाले हैं

जीवनदर्शी चित्रकथा : राजभूषण सहस्रबुद्धे ९८२२२०६०२६

हम काले हैं तो क्या हुआ दिलवाले हैं
हम तेरे तेरे तेरे चाहनेवाले हैं...
हम काले हैं तो क्या हुआ दिलवाले हैं...

गुमनाम (१९६५) या चित्रपटातील मेहमूद यांच्यावर चित्रित केलेले मोहम्मद रफी यांचे स्वरातील हे एक धम्माल विनोदी गीत. परंतु त्यात दडलेलं एक कटू सत्य या पृथ्वीतलावर मानव प्रजातींमधील कितीतरी पिढ्यांची व्यथा मांडतं. ते म्हणजे शरीराच्या काळ्या वर्णावरून होणारा अन्याय, अपमान. याचाच एक दस्तऐवज कथरीन स्टॉकेट या लेखिकेच्या २००९ च्या कादंबरीवर आधारित टेट टेलर दिग्दर्शित ढकए क्एडझ (२०११) या बहुचर्चित, बहु सन्मानित चित्रपटात पाहायला मिळतो.




१९६३ चे वर्ष. अमेरिकेच्या जॅक्सन, मिसिसिपी येथील एबिलीन ही आफ्रिकन-अमेरिकन म्हणजेच कृष्णवर्णीय घरगुती मोलकरीण एलिझाबेथ या उच्चभ्रू श्वेतवर्णी महिलेकडे काम करते. घरातील दिवसभराची सर्व कामे करतानाच तिच्या लहान मुलीलाही पूर्ण ममत्वाने सांभाळण्याचे कामही करावे लागते. ती मुलगी देखील तिला दाई असूनही आईच मानते. इतका लळा. एबिलीन शांत आणि सोशिक स्वभावाची तर स्पष्ट, निडर; परंतु खोडकर मिनी हिलीकडे काम करते. परंतु, सर्व कृष्णवर्णीय मोलकरणींना या श्वेतवर्णी मालकिणींकडून अतिशय हीन दर्जाची वागणूक मिळत असते. त्यांच्याच हातचे जेवण खात, त्यांच्याच अंगाखांद्यांवर मुलं खेळत, झोपी जात. पण तरीही त्यांना अस्पृश्यांसारखी वागणूक म्हणजे त्यांनी वेगळी भांडी वापरायची, वेगळे जेवायला बसायचे, घरातील शौचालय वापरण्यास बंदी. अशा असंख्य नियम अटींवर, तोकड्या पगारावर काम करायचे.

एलिझाबेथ आणि हिलीची मैत्रीण स्कीटर ही २९ वर्षीय श्वेतवर्णी तरुणी जिचे लेखिका बनण्याचे स्वप्न आहे. ती शहरातील वर्णद्वेष आणि मोलकरणींशी होणारा अपमानजनक गैरव्यवहार याकडे सहानुभूतीने पाहते. कारण तिला २९ वर्षे आईपेक्षा जास्त मायेने सांभाळणाऱ्या वृद्ध कृष्णवर्णीय दाई अम्माला तिच्या आईने किरकोळ कारणासाठी अपमानित करून कामावरून काढून टाकलेलं असतं.स्कीटर मोलकरणींचे अनुभव जगासमोर आणण्यासाठी त्यांच्या मुलाखतींवर आधारित एक पुस्तक लिहू इच्छिते. म्हणून ती एबिलीनला विचारते की मोलकरीण म्हणून श्वेतवर्णी मालकिणींचा व्यवहार कसा वाटतो? वर्णद्वेषाबद्दलचे अनुभव व्यक्त करशील का? परंतु एबिलीन आपल्याला सूडभावनेनं अजून भयानक भोगावं लागेल, या भीतीने कचरत असते; पण या चर्चमधील प्रवचनाने तिची हिम्मत वाढते. आणि त्यांना किती नीच स्तरावर वागणूक वर्षानुवर्षे मिळत आहे, याबाबत एककल्ली न होता सर्व स्पष्ट आणि जसंच्या तसं लिहिण्याच्या अटीवर, स्कीटरला सांगण्यास तयार होते.एकटीच्या अनुभवावर नाही तर किमान १०-१२ मोलकरणींनी त्यांचे अनुभव सांगितले तरच त्यातील कटू आणि अमानवी अत्याचारांच्या कथांनी पुस्तकाला एक वजन प्राप्त होईल; पण इतक्या जणी संघटित होणं अशक्य.एकदा बाहेर वादळवारे असल्याने शरीरधर्म पाळण्यासाठी घराबाहेर जाऊ न शकल्याने घरातील शौचालय वापरलं म्हणून मिनीला तिची मालकीण हिली अपमानित करून कामावरून काढून टाकते. घरात चोरी केली म्हणून तिची बदनामीही करते. त्यामुळे वैफल्यग्रस्त मिनीदेखील एबिलीनला शामील होते. मिनीच्या जागी रुजू झालेल्या युल मेला मुलांच्या महाविद्यालयीन प्रवेशासाठी थोडी पैशांची उधारी देण्याची दयादेखील हिली दाखवत नाही. उलट अंगठी चोरल्याच्या आरोपात अटक करवते. ते पाहून हळूहळू इतरही मोलकरणी सहभागी होऊन उत्स्फूर्ततेने आपापले अनुभव कथन करतात आणि स्कीटरचे पुस्तक प्रकाशित होते; पण स्कीटरचे लग्न मोडते. अनामिक नावानं जरी प्रकाशित झाले असले तरी मिळालेले पैसे स्कीटर सर्व मोलकरणींना वाटून टाकते. पुस्तक कृष्णवर्णीयांत लोकप्रिय तर होतेच; परंतु श्वेतवर्णीयांत खळबळ उडते. कारण त्यातील एक प्रकरण मिनीचे असते. ज्यात तिने अपमानाचा बदला म्हणून जाता जाता आपली मालकीण हिलीला स्वतःच्या घरी बनवलेला एक केक आणून खायला देते. तिच्या हाताच्या स्वादाची प्रशंसा करत हिली केकवर तुटून पडते. तेव्हा मिनी तिला सांगते की तू माझ्या मलमूत्राचा केक खाल्लास. हीच तुझी लायकी. हिली उमजून चुकते हे काम कोणाचे आहे ते. अन्यायाला वाचा फोडणारा हा काळा इतिहास टेट टेलर या युवा श्वेतवर्णी दिग्दर्शकाने खूप सुंदर आणि रंजकतेने रजतपटावर जागृत केला आहे. जरी आज स्त्री उंबरठा ओलांडून स्त्रीस्वातंत्र्याचा झेंडा मिरवत, विविध क्षेत्र पादाक्रांत करत, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देत असली तरी त्या उंबरठ्या आतली जबाबदारी झटकून राहतात याच मोलकरणींच्या पारतंत्र्यात. त्यांच्याच संस्कारात आपली मुलं घडवत आहेत आणि सोयिस्करपणे विसरत आहेत की मोलकरणी देखील आजच्याच स्वतंत्र महिला आहेत, ज्यांनी त्यांचा उंबरठा ओलांडला आहे. तेव्हा नारीचा सन्मान आधी नारीनेच वाढवायला हवा.

# कलबुरगि-एसएमव्हीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसने २ वर्षे पूर्ण केली

## १०३.५२% प्रवाशांसह ५.७२ लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला





**सोलापूर/प्रतिनिधी :** कलबुरगि-सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या टर्मिनल (एसएमव्हीटी) बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसने १२ मार्च २०२६ रोजी या भागातील प्रवाशांना समर्पित सेवा देऊन दोन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत, जी आधुनिक रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि प्रवाशांच्या सोयीसुविधांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे. १२ मार्च २०२४ रोजी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या सेवेचे उद्घाटन केले. कर्नाटकची राजधानी आणि आयटी हब बेंगळुरू आणि कल्याण कर्नाटक प्रदेशातील कलबुरगि दरम्यान जलद आणि जागतिक दर्जाची रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली.

यामुळे कर्नाटक आणि राज्याची राजधानी यांच्यातील जलद आणि आरामदायी कनेक्टिव्हिटीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या ट्रेनने प्रवासाचा वेळ कमी केला आहे आणि सोयीस्कर प्रवास करण्यास सक्षम केले आहे, ज्यामुळे व्यावसायिक प्रवासी, अधिकारी, विद्यार्थी आणि काम करणाऱ्या व्यावसायिकांना फायदा झाला आहे. गेल्या दोन वर्षांत, यामुळे बेंगळुरूपर्यंत आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्यसेवेची सुविधा मजबूत झाली आहे, आयटी हब आणि उत्तर कर्नाटक बाजारपेठांमधील व्यापाराला पाठिंबा मिळाला आहे आणि रुग्णांसाठी जलद वैद्यकीय प्रवास देखील सुलभ झाला आहे. या सेवेमुळे कलबुरगि, यादगीर आणि रायचूर सारख्या महत्त्वाच्या शहरांसाठी प्रादेशिक कनेक्टिव्हिटी सुधारली आहे, तसेच मंत्रालयम आणि पुट्टपर्ती (श्री सत्य साई प्रशांती निलयम मार्गे) सारख्या ठिकाणी सहज प्रवेश देऊन तीर्थयात्रा आणि पर्यटनाला चालना मिळाली आहे.

ट्रेन क्रमांक २२२३१/२२२३२ कलबुरगि-एसएमव्हीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेस ५६१ किमी अंतर फक्त ८ तासात पार करते, तर सध्याच्या सुपरफास्ट सेवा १० ते १२ तासांत पूर्ण करतात, ज्यामुळे प्रवासाचा अंदाजे २ ते ४ तासांचा वेळ वाचतो. सध्या, ही ट्रेन आठवड्यातून सहा दिवस धावते आणि यादगीर, रायचूर, मंत्रालयम रोड, गुंटकलम, अनंतपूर, साई पी निलयम आणि येलहंका येथे थांबते.

८ डब्यांच्या वंदे भारत ट्रेन सेटसह एकूण ४५२ आसन क्षमता असलेली ही ट्रेन ४०० चेअर कार (सीसी) सीट्स आणि ५२ एक्झिक्युटिव्ह चेअर कार (ईसी) सीट्स असलेली आहे. ट्रेनची प्रचंड लोकप्रियता तिच्या उल्लेखनीय कामगिरीतून दिसून येते, फेब्रुवारी २०२६ पर्यंत एकूण ५,७२,५६६ प्रवाशांनी प्रवास केला आणि २०२६ मध्ये १०३.५२% प्रवासी प्रवास करत आहेत .

कलबुरगि-एसएमव्हीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसच्या दोन यशस्वी वर्षांच्या सेवेची पूर्तता ही भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरण, प्रवाशांच्या सोयी, वेग, सुरक्षितता आणि शाश्वत वाहतुकीच्या प्रतिबद्धतेचा पुरावा आहे, त्याचबरोबर प्रादेशिक विकास आणि राष्ट्रीय कनेक्टिव्हिटीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

# रेशीम शेती ही ग्रामीण समृद्धीची नवी चळवळ व्हावी-उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ; नांदगाव येथे रेशीम शेतकरी व रीलर्स मेळावा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन गावांची प्रगती व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. याच भूमिकेतून लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात रेशीम शेती क्लस्टर उभारण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी सांगितले. लातूर तालुक्यातील नांदगाव येथील कौसल्या सिल्क रीलिंग (जयराम मठ) येथे आयोजित ''आधुनिक तंत्रज्ञान, समृद्ध रेशीम उद्योग'' या विषयावरील रेशीम शेतकरी व रीलर्स मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

या कार्यक्रमाला लातूरचे रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट, केंद्रीय रेशीम मंडळाचे (धारवड) डॉ. विराज सोमकुंवर, पोखरा योजनेचे तंत्र अधिकारी जयसिंग जगधने, सेवानिवृत्त अधिकारी नरसिंग बावगे, रेणापूर पंचायत समितीचे उपसभापती शरद दरेकर, कौसल्या सिल्क रीलिंगचे संचालक ऋषिकेश कराड आणि बीड जिल्ह्यातील आदर्श सरपंच कालिदास नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेतकऱ्यांनी जुन्या रुढीवादी विचारांतून बाहेर पडून धाडसाने नवीन प्रयोग केले पाहिजेत. ज्या गावात पैशांची खेळती आवक नसते, ते गाव समृद्ध होऊ शकत नाही. रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी रेशीम शेती हा एक शाश्वत आधार आहे. रेशीम कोशांच्या दरात मोठी घसरण होत नसल्याने हे पीक आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आहे, असे श्री. वाघ यावेळी म्हणाले.

रेशीम शेतीसाठी १०० टक्के अनुदान : एस. बी. वराट

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी रेशीम कार्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. मनरेगा योजनेतून रेशीम शेतीसाठी शेड आणि आवश्यक साहित्यासाठी १०० टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाते. रेशीम शेतीला अत्यल्प पाण्याची गरज असल्याने किमान आठ ते दहामाही पाणी सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा उत्तम पर्याय आहे. एकरी वार्षिक अडीच ते तीन लाख उत्पादन मिळत असल्याने नगदी पीक म्हणून रेशीम पीक पुढे येत आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी रेशीम शेतीकडे वळून याला एका जनचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी यावेळी केले.

यावेळी रेशीम शेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रेशीम धागा प्रक्रिया प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कविता साळुंके व प्रियंका कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय रेशीम मंडळाचे डॉ. विराज सोमकुंवर यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कौसल्या सिल्क रीलिंगचे संचालक ऋषिकेश कराड यांनी मानले. या मेळाव्याला लातूर जिल्ह्यातील सरपंच, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दयानंद कला महाविद्यालयात एमपीएससी स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :**येथील दयानंद कला महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ''महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा तयारी व करिअर मार्गदर्शन''या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांना योग्य दिशा देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून गट विकास अधिकारी श्री. शिवकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांना करिअरचा एक सक्षम व प्रतिष्ठित पर्याय म्हणून स्वीकारून सातत्याने अभ्यास करावा, असे मार्गदर्शन केले. अशा प्रकारचे मार्गदर्शनपर कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ करतात, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख मार्गदर्शक श्री. शिवकुमार पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाची पद्धत, वेळेचे योग्य नियोजन तसेच आवश्यक संदर्भ ग्रंथ याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, संयम ,सकारात्मक दृष्टिकोन आणि शिस्तबद्ध तयारी यांचे महत्त्व पटवून दिले. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही आत्मविश्वास, चिकाटी आणि जिद्द यांच्या बळावर स्पर्धा परीक्षांची तयारी केल्यास निश्चित यश मिळवता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा, ग्रंथालय आणि मार्गदर्शन यांचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. देवांश पाचंगे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. नेहा मोरे या विद्यार्थिनीने करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. गजानन घायाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला प्रा. चैतन्य शिंदे, प्रा. आदित्य शिरोळे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मार्गदर्शन सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. त्यामुळे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.

# ''जागृती शुगर'' च्यावतीने ऊसतोड मजूर/कामगारांकरीता दुसऱ्या टप्प्यातील आरोग्य तपासणी व लसीकरण मोहिम शिबीर संपन्न



देवणी : राज्यातील साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या तळेगांव (भो.) ता. देवणी जि. लातूर येथील जागृती शुगर अँण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि., व महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि.१२.०३.२०२६ (गुरूवार) रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, नागराळ ता. देवणी यांचेकडून कारखाना कार्यक्षेत्रातील मौजे-लासोना ता. देवणी येथे गळीत हंगाम २०२५-२६ मधील दुसऱ्या टप्प्यातील ऊसतोड मजूरांकरीता आरोग्य तपासणी शिबीर, लसीकरण व सर्वरोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले.

आयोजित आरोग्य तपासणी शिबीरास पुरूष व महिला ऊसतोड मजूरांचा मोठा प्रतिसाद मिळाला. ऊसतोड मजूरांची लासोना येथे व प्रत्यक्ष ऊस तोडणी सुरू असलेल्या ठिकाणी फिल्डवर जाऊन मोफत आरोग्य तपासणी व ऊसतोड मजूरांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले तसेच कारखाना व्यवस्थापनाचे वतीने महिला ऊसतोड मजूरांना सॅनिटरी नॉपकिन चे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नील एकघरे (प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, तळेगाव (भो), आरोग्य सहा. गायकवाड एच.एन, दंतरावे एस.एस., आरोग्य सेवक महेश मामडे, हवालदार एस. के, आरोग्य सेविका स्नेहा कोतवाल, अमृपाली सुर्यवंशी, कोमल कांबळे, उषा माने, साखरे व सहकारी अमोल रोडे, सुर्यवंशी, गोरे आणि कारखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्याम हिबाने आदी उपस्थित होते. तसेच कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिरादार व रामदास सोळुंके, कार्यालय अधीक्षक (शेती) राजकुमार कांबळे, कृषी पर्यवेक्षक महेश भंडे, विक्रम जांभळे याच्यासह ऊसतोड मजूर, मुकादम, वाहन चालक व कारखान्याचे कृषी विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गॅस सिलेंडरचा साठा आणि पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर; जिल्ह्यात १० भरारी पथके तैनात

**लातूर/प्रतिनिधी :** इराण-इस्त्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात कोणतीही टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पुरवठा विभागाचा आढावा घेऊन घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार आणि व्यावसायिक वापर रोखण्यासाठी कडक पावले उचलण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच गॅस पुरवठ्याबाबत काही तक्रार किंवा समस्या असल्यास नागरिकांनी जिल्हा प्रशासनाच्या ९८९००८४१६८ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गॅस पुरवठा साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर सनियंत्रण व मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच, जिल्ह्यातील गॅस एजन्सींच्या साठा तपासणीसाठी आणि गैरप्रकार रोखण्यासाठी १० विशेष भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. ही पथके जिल्ह्यातील गॅस एजन्सीला, गॅस गोडावूनला सरप्राईज व्हिजिट देऊन गॅस सिलेंडर साठ्याची तपासणी करतील. तसेच घरगुती गॅसचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होत असल्यास संबंधितांवर कारवाई करतील, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी दिली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीधारकांची बैठक घेण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व घरगुती ग्राहकांना प्राधान्याने सिलेंडर पुरवठा करावा. एका कनेक्शन धारकाला २५ दिवसांच्या आत दुसरे सिलेंडर दिले जाऊ नये. तसेच, वितरण केवळ फर्स्ट इन फर्स्ट आऊट' आणि ओटीपी आधारित करावे. गॅस कंपनीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम आकारू नये. घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक वापर केल्यास किंवा काळाबाजार केल्यास अत्यावश्यक वस्तू कायद्यानुसार थेट गुन्हा दाखल करण्यात येईल. एजन्सीधारकांनी दररोजचा साठा प्रशासनाला सादर करणे अनिवार्य आहे. स्टॉक असतानाही हेतुपुरस्सर डिलिव्हरी न केल्यास कडक कारवाई होईल. सर्व गॅस एजन्सी नियमित वेळेनुसार उघड्या ठेवाव्यात, विनाकारण एजन्सी बंद ठेवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

# इंधन सुरक्षा आणि पर्यावरण रक्षण ही लोकचळवळ व्हावी : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांचे आवाहन





**लातूर/प्रतिनिधी :** ब्रह्माकुमारीस द्वारा राजयोग भवन येथे सक्षम - २०२६ जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर मुख्य अतिथी उपस्थित होत्या. इंधनाची बचत ही केवळ गरज नसून ती एक देशसेवा आहे. ऊर्जा सुरक्षा आणि पर्यावरण रक्षण ही आता एक लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले. ऊर्जा बचत करणे हे केवळ सरकारचे काम नाही तर प्रत्येक नागरिकाचे वैयक्तिक कर्तव्य आहे.

केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाद्वारे प्रेरित ''सक्षम'' हे जनजागृती मोहिमांचे मुख्य घोषवाक्य आहे, जे हा संदेश देते की चालणे, सायकल वापरणे आणि ट्रॅफिक सिग्नलवर इंजिन बंद करणे यासारखे छोटे वैयक्तिक प्रयत्न पर्यावरण वाचवण्यात आणि इंधनाचा वापर कमी करण्यात मोठी भूमिका बजावतात. ऊर्जा संवर्धन जनजागृती ऊर्जा दूत अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्याद्वारे करण्यात आले. ब्रह्मा कुमारी नंदा दीदी म्हणाल्या की, आपण सर्वांनी मिळून अध्यात्माच्या माध्यमातून प्रत्येकाने एक युनिट ऊर्जेची बचत केली तर राष्ट्राची दोन युनिटची बचत होणार असल्याचे सांगितले.

ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर म्हणाले की, वाढते प्रदूषण ही जागतिक समस्या असून त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी नैसर्गिक आणि हरित इंधनाचा वापर वाढवणे आवश्यक आहे. कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करून देशाचे परकीय चलन वाचवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने इंधन बचतीचे कर्तव्य पार पाडावे.

ऊर्जा, पर्यावरण आणि शाश्वत विकास या विषयाचे डॉकमेंटरी फिल्म दाखवण्यात आले.''ईंधन संरक्षण की जिम्मेदारी, जनगण की भागीदारी असा संदेश या वेळी देण्यात आला. पारंपरिक इंधन संरक्षण भित्तीपत्रके मान्यवरांच्या हस्ते परिसरात अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब्रह्मा कुमारी पुण्या दीदी यांनी केले.

प्रारंभी सर्व मान्यवरांची पुष्प गुच्छ देऊन व आत्म स्मृती तिलक लावून ब्र.कु. प्रीती, ब्र.कु. जगदेवी यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. आयोजित इंधन बचत डोमेस्टिक वर्कशॉप मधे शहरातील अनेक मान्यवर महिला सहभागी झाले. कार्यक्रमाचा समारोप सक्षम प्रतिज्ञेने करण्यात आला.

# गांधी विचार संस्कार परीक्षेत दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे घवघवीत यश

## जिल्ह्यात प्रथम व द्वितीय क्रमांक; विद्यार्थिनींना सुवर्णपदके, डॉ. माधवी कुलकर्णी शिक्षक गटातून द्वितीय

**लातूर/प्रतिनिधी :** जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षा २०२५२६ मध्ये दयानंद कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एम.कॉम. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी सानिया फारूख शेख हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक, तर बी.कॉम. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी निशीका हेलाळे हिने द्वितीय क्रमांक पटकावत सुवर्णपदके मिळवली.

तसेच शिक्षक गटातून दयानंद कॉमर्स कॉलेजच्या प्रा.डॉ. माधवी कुलकर्णी यांनी जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळवत यश संपादन केले. या यशस्वी विद्यार्थी व प्राध्यापकांचा प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, बीसीए विभाग प्रमुख डॉ. शशीकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ. वैशाली सातपुते, समन्वयक प्राध्यापक मेरवान राठोड, प्राध्यापिका अमृता बनसोडे तसेच विद्यार्थी उपस्थित होते. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी आणि संचालक मंडळाने सानिया शेख व निशीका हेलाळे यांचे अभिनंदन केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# शरण पाटील यांची 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' समितीच्या सह-अध्यक्षपदी निवड



धाराशिव (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेली 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आता उमरगा-लोहारा मतदारसंघात अधिक प्रभावीपणे राबविली जाणार आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मतदारसंघनिहाय समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी विशेष समिती गठीत केली असून, धाराशिव जिल्ह्याचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांची उमरगा-लोहारा मतदारसंघासाठी सह-अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

शरण पाटील यांनी यापूर्वीही मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या व्यथा ओळखून 'शरण पाटील फाउंडेशन'च्या माध्यमातून स्वतःच्या खर्चातून पाणंद रस्त्यांचे मोठे जाळे उभे केले आहे. पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी होणारी शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर करून त्यांनी महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यांच्या या लोकहिताच्या कार्याची आणि प्रदीर्घ अनुभवाची दखल घेत, तसेच उमरगा-लोहारा मतदारसंघातील पाणंद रस्त्यांचा यशस्वी पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्याच्या उद्देशाने त्यांची या सह-अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामासाठी आणि शेतमाल बाजारपेठेपर्यंत विनासायास नेण्यासाठी हे पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. या समितीच्या माध्यमातून आता शासकीय स्तरावर अधिक गतिमान आणि प्रभावी काम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. उमरगा-लोहारा मतदारसंघस्तरीय समितीत शरण पाटील यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून पुढील सामाजिक कार्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश : भव्य स्मारक उभारणीचा मार्ग मोकळा
## मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)**- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य स्मारकाची अनेक वर्षांपासूनची प्रतीक्षा आता संपली आहे. धाराशिव शहरातील शासकीय दूध शीतकरण केंद्राची एक एकर जागा या स्मारकासाठी विनामूल्य देण्याचा अधिकृत आदेश जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी निर्गमित केला आहे. विशेष म्हणजे, या जागेसाठी द्यावे लागणारे सुमारे २ कोटी ८ लाख रुपयांचे मूल्य शासनाने माफ केल्याने नगरपरिषदेचीही आर्थिक बचत झाली आहे. त्यामुळे भव्य स्मारक उभारणीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा आणि भव्य स्मारक उभारण्यात यावे अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती. त्यानुसार या स्मारकाच्या उभारणीसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून यापूर्वीच आपण १.५० कोटी निधी मंजूरही करवून घेतला आहे. पालिका निवडणुकीच्या अगोदर शहरात अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याचे अभिवचनही आपण वचननाम्याच्या माध्यमातून शहरवासीयांना दिले होते. तत्कालीन महसूलमंत्री ना.श्री. राधाकृष्णजी विखे पाटील यांनी ऑगस्ट महिन्यात जागा हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला होता मात्र त्यासाठी नगरपालिकेला शासनाकडे जागेच्या मोबदल्यात बाजारभावाप्रमाणे २ कोटी ८ लाख भरणे आवश्यक होते. पालिकेकडे निधी नसल्याने हा विषय प्रलंबित होता. पालिकेची आर्थिक स्थिती पाहता ही रक्कम माफ करण्याची विनंती आपण शासनाकडे केली होती. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर सकारात्मक निर्णय होऊन ९ जानेवारी २०२६ रोजी महसूल व वन विभागाने या जागेला 'भोगवटादार वर्ग-२' अंतर्गत महसूलमुक्त आणि मूल्यरहित तत्वानुसार मंजुरी देत जागा विनामुल्य देण्याचा निर्णय घेतला होता.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी धाराशिव शहरातील शीतकरण केंद्राच्या अखत्यारीतील असलेली १ एकर जागा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी नगरपरिषदेकडे हस्तांतरित केली आहे. सोमवारी तसा अधिकृत आदेश त्यांनी जारी केला आहे. त्याचबरोबर या जागेच्या चतुःसिमाही निश्चित करण्यात आल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. या जागेवर भव्य स्मारक, आकर्षक उद्यान आणि सुसज्ज अशी अभ्यासिका उभारण्यात येणार आहे. स्मारकामध्ये केवळ अण्णाभाऊंचा पूर्णाकृती पुतळाच नसेल, तर त्यासोबतच सुसज्ज बाग बगीचा परिसराच्या सुशोभीकरणासाठी आकर्षक उद्यानही विकसित केले जाणार आहे. विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊंच्या साहित्यावर आधारित अभ्यास केंद्र हे या स्मारकाचे आणखी एक वैशिष्ट्य असणार आहे. लोकशाहीर अण्णाभाऊंच्या विचारांची आणि सामाजिक लढ्याची स्मृती जिवंत ठेवणारे हे जिल्ह्यातील पहिले आणि मोठे स्मारक ठरणार आहे.

**व्यापक लोकसहभागाची कृती समिती : आमदार पाटील**

धाराशिव शहरात साकारण्यात येणाऱ्या साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊंच्या भव्य स्मारकासाठी व्यापक कृती समिती गठित करण्यात येणार आहे. त्याची नोंदणी करून बँकेत खाते उघडले जाईल. पारदर्शकता रहावी यासाठी केवळ धनादेशाद्वारे थेट बँक खात्यात लोकसहभाग स्वीकारण्यात येईल. समाजबांधवांसह विविध समाज घटकातील नागरिकांच्या सहभागाने जिल्ह्यातील एक भव्य आणि ऐतिहासिक स्मारक उभारण्याचा आपला प्रयत्न आहे. सर्वप्रथम आपण स्वतः एक लाख रुपयांचा व्यक्तिगत सहभाग लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी देत असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

# बालकलाकारांनी देशभक्तीपर सादर केली रंगतदार नृत्य-गीतांची मैफल



नळदुर्ग (प्रतिनिधी)-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुदावाडी येथील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा आणि विद्यार्थी सर्वगुणसंपन्न व्हावेत, या उद्देशाने शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात बालकलाकारांनी ओव्या, देशभक्तीपर पर्यावरण, सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कोळी गीत, शेतकरी गीत, गणेश वंदना, विनोदी किर्तन, अंबाबाई गीत, लेझीम नृत्य, विनोदी बातम्या, साक्षरता गीत, खंडोबा गीत, लोकगीते आणि लावणी अशा विविध कलागुणांवर उत्कृष्ट नृत्य व गायन सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच सरोजिनी कबाडे तर उद्घाटक म्हणून जवाहर महाविद्यालय, अणदूर च्या माजी प्राचार्या डॉ. अनिता मूदकण्णा, डॉ. सिदरामप्पा खजूरे, पोलिस पाटील बसवेश्वर सांगवे आणि गावातील इतर मान्यवर उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश जवळगे व उपाध्यक्ष शिल्पा चिंचोले यांनीही कार्यक्रमास सन्मान दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक विलास चव्हाण, वर्षा शृंगारे, प्रीती टेंभुरकर, शुभदा कुलकर्णी, विनय कंदी, संगीता घुगे, शांताराम गायकवाड, ओंकार कबाडे, निखिल नरवडे, धनू जवळगे, बबलू बिराजदार, ब्रह्मानंद कबाडे, अच्युत सांगवे, स्वप्नील टिकंबरे, सुंदर घोडके, शिल्पा जवळगे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शांताराम गायकवाड आणि वर्षा शृंगारे यांनी केले, तर आभार अध्यक्ष गणेश जवळगे यांनी मानले. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ शाळेतील विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास साधण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुदावाडी येथे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात बालकलाकारांनी देशभक्तीपर गीत, लोकगीते, शेतकरी गीत, सावित्रीबाई फुले यांचे प्रेरणादायी गाणे, तसेच छत्रपती शिवाजी आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे वीरगाथा गाणे व नृत्य सादर केले. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे कलागुण खुलले आणि त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली. तसेच शाळेतील सामूहिक सहभाग, संघटन कौशल्य व एकात्मता वृद्धिंगत झाली. पालक, शिक्षक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय अनुभव ठरला.

# टायर फुटून कार हॉटेलात

उमरगा तुळजापूर देवदर्शन करून हैदराबादच्या दिशेने वेगाने निघालेल्या कारचे टायर फुटले. कार रस्त्याकडेच्या हॉटेलमध्ये घुसली. तेथे चहा पित बसलेले दोघे जागीच ठार झाले. तर दोघे जखमी झाले. मृतामध्ये माजी नगरसेवक, व्यावसायिकाचा समावेश आहे. हा अपघात मंगळवारी दुपारी उमरगा तालुक्यातील जकेकूर चौरस्ता उड्डाणपुलाजवळ हा अपघात घडला. माजी नगरसेवक बळीराम पवार व व्यावसायिक लाडनशा मुर्शद अशी मृतांची नावे आहेत.

याबाबत माहिती अशी की, जकेकूर चौरस्ता येथील उड्डाण पुलाजवळ राष्ट्रीय महामार्गालगत एका लिंबाच्या झाडाखालील महादेव देडे यांचे पत्र्याचे छोटे चहाचे हॉटेल आहे. तेथे माजी नगरसेवक बळीराम कुशाप्पा पवार (वय ४८), व्यावसायिक लाडनशा गुलाबशा मुर्शद (५२), मेकॅनिक सचिन भीमाशंकर कुटार (३०) हे तिघे जण चहा पित बसले होते. दरम्यान देवदर्शन करून नवदाम्पत्य सोलापूरहून हैदराबादच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या कारचे (टीएस ३४ एफ ४७०६) समोरच्या उजव्या बाजूचे टायर अचानक फुटल्यामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. कार थेट महामार्गालगतच्या चहाच्या टपरीत घुसली. या भीषण अपघातात टपरीत चहा पित बसलेले बळीराम पवार, लाडनशा मुर्शद या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर सचिन कुटार गंभीर जखमी झाले, टपरीचालक महादेव देडे हेही जखमी झाले आहेत.

हॉटेलसह तीन दुचाकींचेही नुकसान

या अपघातादरम्यान तीन दुचाकीचे नुकसान झाले. घटनेतील जखमींना तातडीने जवळच्या एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मयत बळीराम पवार, लाडनशा मुर्शद यांचे मृतदेह शवविच्छेदनास उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# दिव्यांगांसाठी प्रशासनाचा मोठा इशारा! UDID कार्ड अनिवार्य - लाभ थांबू नयेत म्हणून तातडीने नोंदणी करा

धाराशिव ( रामेश्वर डोंगरे )-धाराशिव तहसील कार्यालयाकडून दिव्यांग बांधवांसाठी एक महत्त्वाचे सार्वजनिक आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ सुरळीतपणे मिळावा यासाठी UDID (Unique Disability ID) कार्ड काढणे आता अनिवार्य करण्यात आले असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेन्शन योजना यांसारख्या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी णऊखऊ कार्ड तयार करून घ्यावे, अन्यथा भविष्यात योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येऊ शकतात.

शासनाच्या २७ जून २०२४ च्या निर्देशानुसार दिव्यांग लाभार्थ्यांची माहिती णऊखऊ प्रणालीमध्ये नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांनी अद्याप णऊखऊ कार्ड काढलेले नाही किंवा ज्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र ऑनलाईन नोंदणीकृत नाही, त्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तहसील कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, धाराशिव तालुक्यात अजूनही अनेक दिव्यांग लाभार्थ्यांनी णऊखऊ कार्ड काढलेले नाही. अशा सर्व लाभार्थ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि आवश्यक कागदपत्रांसह संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून णऊखऊ कार्ड तयार करून घ्यावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तसेच सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि विविध पक्षांचे पदाधिकारी यांनी आपल्या परिसरातील दिव्यांग नागरिकांना याबाबत माहिती देऊन शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी हे आवाहन करताना सांगितले की, शासनाच्या सूचनांनुसार दिव्यांग लाभार्थ्यांची नोंदणी णऊखऊ प्रणालीमध्ये करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व दिव्यांग नागरिकांनी तातडीने UDID कार्ड काढून शासनाच्या योजनांचा लाभ सुरक्षित करावा.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# विश्वभूषण, परमपूज्य, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या विविध समिती प्रमुखांच्या निवडी



धाराशिव (प्रतिनिधी) - विश्वभूषण, परमपूज्य, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची बैठक धनंजय नाना शिंगाडे यांच्या संपर्क कार्यालयात राजाभाऊ बागल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत जयंती उत्सव समितीच्या विविध समित्यांचे गठन करून त्या समितींच्या प्रमुख पदाची जबाबदारी निश्चित करण्यात आली. यामध्ये जयंती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, मिरवणूक प्रमुख, प्रमुख सल्लागार, संरक्षण प्रमुख, कायदेशीर सल्लागार, सांस्कृतिक प्रमुख आदी समित्यांच्या प्रमुखांवर जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत.

विश्वभूषण, परमपूज्य, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण उर्फ आबासाहेब सुर्यवंशी यांची तर कार्याध्यक्षपदी सुधीर पवार तसेच उपाध्यक्षपदी अर्जुन पवार व शशिकांत माने यांची तर सचिव सतीश कदम यांची सहसचिव वाजिद सय्यद तसेच कोषाध्यक्ष विशाल शिंगाडे यांची निवड करण्यात आली आहे. तर मिरवणूक प्रमुख म्हणून प्रज्ञावंत ओहाळ, राजाभाऊ सरवदे, प्रसेंजित शिंगाडे, महेश शिंगाडे, प्रतिक कांबळे, सारीपुत शिंगाडे, प्रशांत कांबळे, सौरभ शिंगाडे, सम्राट वाघमारे, यशवंत शिंगाडे, अजिंक्य बनसोडे, अब्दुल हफिज, फजल सय्यद, चंद्रकांत पांढरे, महेश जेटीथोर, रिझवान शेख, अजहर शेख, आयाज शेख, जावेद शेख, आकाश माळाळे, अजिंक्य लोहारेकर, शकील सय्यद, रिंकल गायकवाड, दिनेश पाटील, आप्पा गायकवाड, स्वराज शिंदे, ओम सुर्यवंशी, प्रशांत भालेराव, दिग्विजय देशमुख, संजय देशमुख व रहीस शेख यांची तर प्रमुख सल्लागार म्हणून मसुद शेख राजा भाऊ बागल, नंदकिशोर शेटे, आबासाहेब खोत, लक्ष्मण माने, रावसाहेब शिंगाडे, मुकुंद घुले, ॲड परवेज काझी, इलियास मुजावर, अनिरुद्ध कावळे, सुभाष पवार, रवी कोरे, पांडुरंग भोसले, नाना घाटगे, पप्पू मुंडे आणि सल्लागार म्हणून आयाज उर्फ बबलू शेख, खलीफा कुरेशी, शरणम शिंगाडे, सुनील शिंगाडे यांची आणि कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड राकेश पवार यांची तसेच संरक्षण प्रमुख म्हणून कृष्णा भोसले, सागर भास्कर, अनिकेत क्षीरसागर, रोहन बनसोडे, अविनाश शिंगाडे, लहू बनसोडे, आतिष बनसोडे, विनोद रोकडे, राजपाल गायकवाड, प्रदीप बनसोडे, सावन माळाळे, अजित जेटीथोर यांची निवड केली आहे. या बैठकीस आबासाहेब खोत, लक्ष्मण माने, सतीश कदम, सुधीर पवार, पांडुरंग भोसले आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649